विषय :- महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ व महामंडळाची दुय्यम कंपनी प्रताप मिल, अमळनेर यांचे सन २०१९-२० चे वार्षिक अहवाल विधान मंडळाचे सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनांत सादर करण्याबाबत.

उपरोक्त विषयावरील महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ व महामंडळाची दुय्यम कंपनी प्रताप मिल, अमळनेर यांचे सन २०१९-२० चे वार्षिक अहवाल विधान मंडळाचे सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनांत विलंबाने सादर करण्याबाबतची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सन २०१९-२० च्या लेख्यांचे लेखापरीक्षण उशीराने माहे मार्च, २०२१ मध्ये सुरु झाले. सदरचे लेखे तपासणीचे काम लेखापरीक्षकांनी त्यांच्या कार्यालयातून केल्याने तपासणी पूर्ण होण्यास विलंब झाला. संचालक मंडळाने त्यांच्या दिनांक १२.०१.२०२२ रोजीच्या बैठकीत लेखे मंजूर केले असून सदरहू लेखे महालेखाकार यांच्याकडे त्यांच्या टिका-टिप्पणीसाठी दि. २०.०१.२०२२ रोजी पाठविले. महालेखाकार कार्यालयाकडून लेखे तपासणी होऊन टिकाटिप्पणीसह प्रमाणपत्र दि. २५.०५.२०२२ रोजी प्राप्त झाले. महामंडळाच्या भागधारांकच्या दि. २९.०७.२०२२ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सदर लेख्यांना मंजूरी प्राप्त झाल्यावर सदरचे लेखे छपाई केल्यानंतर विधान मंडळाच्या पटलावर मंजूरीसाठी सादर करण्यात आले.

कक्ष अधिकारी ( श्रीम. पठाण )

### लेखा वर्ष संपल्यापासून लेखे सभासदांनी मंजूर करेपर्यंत झालेल्या घटनांची दैनंदिनी

सन २०१९-२०

| अ. क्र. | तपशील | महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित,मुंबई | प्रताप मिल्स, अमळनेर |
|---|---|---|---|
| १. | लेखा वर्ष संपल्याची तारीख | ३१.०३.२०२० | ३१.०३.२०२० |
| २. | लेखा तपासनीसांच्या नेमणूकीची तारीख | २७.०९.२०१९ | २७.०८.२०१९ |
| ३. | लेखे तपासून बोर्डाने मंजूर केल्याची तारीख | १२.०१.२०२२ | १०.०२.२०२१ |
| ४. | लेखा तपासनीसांनी लेख्यांवर अंतिम अहवाल दिल्याची तारीख | १२.०१.२०२२ | १५.०२.२०२१ |
| ५. | लेखे, महालेखापाल (वाणिज्यिक) यांच्याकडे भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या टिपा टिप्पणीसाठी देण्याची तारीख | २०.०१.२०२२ | १८.०२.२०२१ |
| ६. | लेख्यांवर भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या टिपा टिप्पणी मिळाल्याची तारीख | २०.०५.२०२२ | १८.०३.२०२१ |
| ७. | भागधारकांनी लेखे मंजूर केल्याची तारीख | २९.०७.२०२२ | ०३.०७.२०२१ |

=o=o=o=o=o=o=

D:\sudha\Personel Dept\Pers 17\Letter 17.doc